# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 13/11/2022 (रविवार) सायंकाळ

---

### खुन करणाऱ्या आरोपीला अटक

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :— अंतर्गत ०४ कि.मी अंतरावरील गंगापूर टाकळघाट येथे दिनांक १२/११/२०२२ चे २०.०० वा. २०.३० वा. दरम्यान यातील आरोपी नामे— 1) अमोल दिलीप गेडाम, वय २० वर्ष, २) वंश अरूण माजी, दोघेही रा. गांगापूर टाकळघाट यांनी फिर्यादी नामे— बबीता सुनिल भजे, वय ३५ वर्ष, रा. गांगापूर झोपडपट्टी टाकळघाट याचे घरात येवून फिर्यादीचे पति मृतक नामे— सुनिल गुलाब भजे, वय ४० वर्ष याला म्हणाला की, ‘‘तु पोलीसांचा मुखबिर आहे’’ असे म्हणून फिर्यादीचा पति मृतक सुनिल भजे यांस जिव घेण्याच्या उद्देशाने लोखंडी पाईप व लाकडी बल्ली ने दोन्ही आरोपींनी जिवानीशी ठार केल्याने मृतकास पी.एच.सी. टाकळघाट येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी तपासून जास्त गंभीर मार असल्याचे सांगून मेडीकल नागपूर येथे रेफर केल्याने मृतकास मेडीकल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. एम.आय.डी.सी. बोरी येथे आरोपींविरुध्द ३०२, ४५७, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. ०१) याला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन रामटेक करीत आहे.

### खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना अटक

**पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत ०५ कि.मी अंतरावरील लें—आउट नैवेदयम हॉटेलच्या मागे, न्यू नांदा, कोराडी येथे दिनांक १२/११/२०२२ चे १९.३० वा. १९.४५ वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे—सोनू दुर्गाप्रसाद तिवारी, वय २८ वर्ष, रा. पांडे लें—आउट नवैदयम हॉटेलच्या मागे, न्यू नांदा कोराडी ता. कामठी जिल्हा नागपूर हा सांयकाळी ०६.०० वा. हा आपले घरी हजर असतांना अंदाजे सायंकाळी ०७.३० वा. चे सुमारास रोडवर आवाज आला असता तेव्हा फिर्यादीने रोडवर येवून पाहीले असता तर ब्रिजबिहारी सिंग यांचे घराचे बाजूला यश पाटील व त्याचा मोठा भाउ निखिल पाटील व मोहल्यातील मुले बसून हुल्लडबाजी करीत असतांना फिर्यादीने त्यांना दारू गांजा पिण्यास मनाई केली तेव्हा यातील आरोपी नामे— १) निखिल आनंद पाटील, वय २० वर्ष, २) यश आनंद पाटील, वय १८ वर्ष, ३) आनंद बाबूराव पाटील, वय ६२ वर्ष, तिन्ही रा. न्यू नांदा, प्लॉट नं. ४५ जिल्हा नागपूर हे झंगडा—भांडण करू लागले व त्यांनी आपले वडील नामे—आनंद पाटील यांना बोलावून सोबत हातात घरून कु—हाड व नारळ कापण्याचा चाकू आणून सातपुते यांच्या घराजवळ आरोपी यश पाटील व निखिल पाटील यांनी कु—हाडीने डाव्या हातावर मारले. तेव्हा फिर्यादीची आई झंगडा—भांडण सोडविण्यास गेली असता यश पाटील व आनंद पाटील यांनी झंगडा—भांडण करून यश पाटील यांने डोक्यावर कु—हाडीने मारून गंभीर जख्मी केले. यातील फिर्यादीने आरोपीतांना ‘‘सिंग याचे घराजवळ का बसता’’ असे विचारले या कारणावरून आरोपीतांनी फिर्यादीचे डाव्या हातावर व फिर्यादीचे आईच्या डोक्यावर कु—हाडीने मारून गंभीर जख्मी करून जिवानिशी ठार मारण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन खापरखेडा येथे आरोपींविरुध्द कलम ३०७, ३२४, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन खापरखेडा करीत आहे.

## खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा दाखल

**पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत ०६ कि.मी अंतरावरील गृहमंगलधाम सोसायटी, पांडे ले आउट, न्यु नांदा येथे दिनांक १२/११/२०२२ चे १९.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे—निखील आनंद पाटील, वय २० वर्षे, रा. प्लॉट नं. ४२ गृहमंगलधाम सोसायटी पांडे हा त्याचे घरासमोरील रोडवर फोनवर बोलत फिरत असतांना आरोपी नामे— सोनू दुर्गाप्रसाद तिवारी, वय ३५ वर्षे, रा. न्यु नांदा ता. कामठी जिल्हा नागपूर याचेकडे फिर्यादीने बघितले असता ‘‘क्या देख रहा है घूर के मेरे तरफ चल जा यहां से’’ असे म्हणून फिर्यादीचे डोक्यावर हाताने मारले. फिर्यादीने घरी जावून आपले घरच्यांना याबाबत सांगितले व त्याने का मारले म्हणून विचारायला फिर्यादी, त्याचे आई वडील व लहान भाऊ त्याचेकडे जायला निघाले, तर आरोपी हा त्याचे आईसोबत हातात लाकडी दंडा घेवून फिर्यादीचे घरासमोर रोडवर आला. व फिर्यादीचे आईवडीलाशी तोंडातोंडी करून शिवीगाळी करू लागला व आरोपीने फिर्यादीस अश्लील शब्दात शिवीगाळ करून त्याच्या हातातल्या लाकडी दंडयाने जोरात फिर्यादीचे डोक्यावर मारून गंभीर जखमी केले. त्याने दंडयाने पुन्हा फिर्यादीचे डोक्यावर मारायला गेला तेव्हा त्याने हात आडवा केला तर दंडा उजवे हातावर लागला. फिर्यादीचा लहान भाऊ यश हा तिथे वाचवायला मध्ये आला तर आरोपी याने त्यालासुध्दा दंडयाने उजव्या हाताला आणि कमरेजवळ मारून जखमी केले. ‘‘तुमको जान से मार डालुंगा तुमको बस्ती मे रहने नही दुंगा’’ अशी धमकी दिली. यातील आरोपीस फिर्यादी हा महार जातीचा आहे हे माहीत असून सुध्दा सिंग याचे घराजवळ का बसता या कारणावरून फिर्यादी सोबत भांडण करून लाकडी दंडयाने त्याचे डोक्यावर मारून जिवानिशी ठार मारण्याचा प्रयत्न केला तसेच त्याचे भावालासुध्दा लाकडी दंडयाने कमरेवर व हातावर मारून जखमी केले. व अश्लील शिवीगाळ करून जिवाने ठार मारण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन खापरखेडा येथे आरोपींविरुध्द ३०७, ३२४, २९४, ५०६, भा.द.वि. सहकलम ३ (१) (आर) (एस) ३(२) (व्हि) (ऐ) अ. जा. ज. अ. प्र. कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी यास कु—हाडीने मार लागला असून तो गंभीर जखमी असल्यामुळे अ‍ॅलेक्सीस हॉस्पीटल, नागपूर येथे उपचारकामी भरती असल्याने तूर्तास अटक करण्यात आलेली नाही. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन खापरखेडा करीत आहे.

**पोलीस माहिति कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**